# डॉ.आंबेडकर जयंतीनिमित्त खुल्या निबंध स्पर्धा

**देगलूर / प्रतिनिधी**

अडत व्यापारी शिक्षण संस्था संचलित देगलूर महाविद्यालयातील लोकप्रशासन विभाग व द फोरम ऑफ पब्लिक एडमिनीस्ट्रेशनच्या संयुक्त विद्यमाने भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त १२ एप्रिल रोजी खुली निबंध स्पर्धा होणार आहे. प्रस्तुत स्पर्धेत यशस्वी ठरलेल्या ३ विद्यार्थ्यांना भारतीय संविधान, वढरउ व टढरउ साठी उपयुक्त संदर्भ ग्रंथ व पुस्तके बक्षीस स्वरुपात दिली जाणार आहेत. स्पर्धेसाठी खालील विषय ठेवण्यात आले आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे प्रशासकीय विचार. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे राजकीय विचार. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक विचार. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक तत्वज्ञान या पैकी एका विषयावर निबंध स्पर्धेत भाग घेता येईल. ही स्पर्धा दिनांक १२ एप्रिल बुधवार रोजी सकाळी ११ ते १२ दरम्यान होणार आहे. इच्छुक विद्यार्थ्यांनी लोकप्रशासन विभागप्रमुख डॉ. बी. आर. कतुरवार , डॉ.एस.एम.देबडे, डॉ.बालाजी कोंकटवार, डॉ. धनराज लझडे यांच्याकडे नावे नोंदवावीत असे आवाहन प्राचार्य डॉ.मोहन खताळ यांनी केले आहे.

Scanned with OKEN Scanner